**Unit IV**

# कंपनी सरकारविरुद्ध बंड

## 1) आदिवासींचे बंड

1757 साली प्लासीचे युद्ध जिंकुन इंग्रजांनी या देशात त्यांच्या सत्तेचा पाया घातला. हळूहळू इतर प्रदेश काबीज करीत ब्रिटिश सत्तेचा विस्तार झाला. त्याचबरोबर येथील प्रत्येक क्षेत्रात आपणाला हवा तसा बदल करु लागले. या देशातील प्रस्थापित राजकीय, सामाजिक, आर्थिक, शेतीविषयक, औद्योगिक, सांस्कृतिक अशा सर्व घटकावर आणि समाज जीवनावर परिणाम होऊ लागले. प्रत्येक वर्ग या ना त्या कारणाने दुखावला जाऊ लागला. त्यांच्यात असंतोष वाढत गेला. आपल्या कंपनीला आणि देशाला जास्तीत जास्त आर्थिक फायदा होईल असे महसूल धोरण राबविले. त्यामुळे भारतातला शेतकरी वर्ग आणि आदिवासी वर्ग दुखावला गेला.

आदिवासी लोक म्हणजेच वन्य जाती जमातीचे जंगलाशी कनिष्ठ नाते होते. अन्न, लाकूडफाटा, जनावरांची वैराण यासाठी आदिवासी लोक जंगलावर अवलंबून असत. वसाहतवादातून ब्रिटिशांनी जंगल जमिनी आपल्या ताब्यात घेतल्या. आदिवासींचे जंगलाशी प्राचीन काळापासून जे नाते होते ते त्यांनी बदलले. जंगल जमिनीच्या उपयोगावर अनेक बंधने आणली. त्यामुळे पूर्वीप्रमाणे आदिवासींना जंगलाचा उपयोग करता येईना. आपले स्वातंत्र्य नष्ट झाले अशी त्यांची भावना झाली. त्यांच्यात असंतोष निर्माण झाला. ब्रिटिश सरकारने आदिवासी टोळ्यांच्या प्रमुखांना जमीनदार बनवले. त्यांच्यामार्फत इंग्रजांनी आपले नवीन महसूल धोरण राबविले. तसेच कर वसुलीसाठी त्यांचा वापर करू लागले. त्यातून सामान्य आणि गोरगरीब आदिवासींवर अन्याय करणारा हा नवीन वर्ग तयार झाला. हा एक दलालांचा सावकार वर्ग लोकांची पिळवणूक करू लागला. यांच्या पाठीशी इंग्रज सरकारच आहे असे वाटून असंतोष वाढत गेला. आदिवासी लोक गरीब अज्ञानी होते, अशा समाजात ख्रिश्चन मिशनरी लोक अधिक प्रमाणात येऊ लागले. समाजसेवे बरोबर हे ख्रिश्चन मिशनरी लोक ख्रिश्चन धर्म प्रसार करू लागले. धर्मांतराचे प्रमाण वाढले. आपल्या परंपरा जपणारे, त्याच सांस्कृतिक जीवनात आनंद मानणारे हे आदिवासी लोक असून त्यांनाही हे धर्मसंकट वाटून असंतोष वाढला.

एकंदरीतच राजकीय व आर्थिक वर्चस्व मिळाल्यावर इंग्रजांनी या देशातील एकूण सर्व क्षेत्रात आपणाला हवे तसे बदल केले. त्यामुळे वरिष्ठ कनिष्ठ वर्गाबरोबर शेतकरी, आदिवासी असे सगळेच दुखावले गेले. यापैकीच आदिवासी हा एक महत्त्वाचा समाजघटक असून आपल्यावर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध त्यांनी कंपनी सरकारचे विरुद्ध लढा दिला. हे आदिवासी भारतातल्या वेगवेगळया प्रदेशात राहणारे विविध नावाने ओळखले जात. त्यांच्या त्या त्या नावानेच त्यांनी केलेले उठाव ओळखले जातात. साधारणपणे हे उठाव 1757 ते 1856 या काळातील आहेत.

**बंगाल आणि पूर्व भारत:-**

**1)संन्याशांचे बंड:-**

बंगालमध्ये ब्रिटिश सत्ता स्थापित झाल्यामुळे व ओघानेच आलेल्या नव्या अर्थव्यवस्थेमुळे तेथील जमीनदार शेतकरी, कारागीर यांना धुळीस मिळावे लागले. अशातच 1770 मध्ये भयंकर दुष्काळ पडला. हा दुष्काळ आणि कंपनीच्या अधिकाऱ्यांचे दूरवर्तन म्हणजे परकीय सत्तेची देणगी होय असे लोक म्हणू लागले. तीर्थक्षेत्रांच्या जाण्यावर निर्बंध लागल्याने संन्याशी अतिशय संतप्त झाले. अन्यायाविरुद्ध लढण्याची संन्याशांची परंपरा होती. त्यानुसार जनतेच्या सहकार्याने त्यांनी कंपनीच्या वखारी वर, खजिन्यावर हल्ले केले. कंपनीच्या सैनिकांशी ते शूरपणे लढले आणि वॉरन हेस्टींगच्या एका दीर्घ संघर्षानंतरच त्यांच्यावर विजय मिळू शकला. संन्यासांच्या या बंडाचा उल्लेख बंकिमचंद्र चॅटर्जी ने आपल्या 'आनंदमठ' कादंबरीत केला आहे.

**2)चुआर आणि हो यांचे बंड:-**

दुष्काळ, वाढलेला भूमी कर आणि इतर आर्थिक संकटामुळे मिदनापूर जिल्ह्यातील आदिवासी असलेल्या चुआरानी शस्त्र उचलले. दलभूमी, कैलापाल, ढोलका व बाराभूम येथील राजांनी एकत्र येऊन 1768 मध्ये बंड पुकारले व आत्मघाती नीतीचा अवलंब केला. हा प्रदेश अठराव्या शतकापर्यंत धगधगत होता.

छोटा नागपूर आणि सिंहभूम जिल्ह्यातील हो आणि मुंडा लोकांनीही आपला संताप आवरता आला नाही. त्यांनी 1820 ते 22 आणि पुन्हा 1831 मध्ये कंपनीशी संघर्ष केला. 1837 पर्यंत ह्या प्रदेशात असंतोष कायम होता.

**3)कोलामधील असंतोष:-**

छोटा नागपुर परिसरातील कोल जमातीची जमीन त्यांचे पुढारी असलेल्या मुंडापासून हिसकावून घेऊन ती मुसलमान शेतकऱ्यांना व शिखांना दिल्यामुळे कोल जमातींमध्ये प्रचंड संताप निर्माण झाला. ह्या संतापाच्या वणव्यात जवळजवळ 1000 परकीय व बाहेरील लोकांना ठार करण्यात आले किंवा जिवंत जाळण्यात आले. 1831 मधील हे बंड रांची, सिंहभूम हजारीबाग, पलामऊ व मानभूमच्या पश्चिम भागात पसरले. या बंडाचे दमन करण्यासाठी ब्रिटीशांना मोठा दीर्घकालीन संघर्ष करावा लागला.

**4) संथाल जमातीचे बंड:-**

भूमीकर अधिकाऱ्याचे दुर्वर्तन, पोलिसांचे दमनचक्र आणि जमीनदार व सावकारांकडून जुलमी वसुली याविरुद्ध राजमहाल जिल्ह्यातील संथाल जमातीने आपला राग व्यक्त करीत 1855 मध्ये सिंधू व कान्हू यांच्या नेतृत्वाखाली कंपनीची सत्ता समाप्त करण्याची घोषणा केली व आपले स्वातंत्र्य जाहीर केले. मोठ्या प्रमाणावरील लष्करी कारवाईनंतर 1856 मध्ये स्थिती नियंत्रणाखाली आली. त्यासाठी सरकारला स्वतंत्र संस्थाल जिल्हा निर्माण करून संथाल जमातीचा राग शांत करावा लागला

**5)अहोमांचे बंड:-**

आसाममधील अहोम सरदारांनी कंपनीवर असा आरोप केला की, ब्रह्मदेशाशी सुरू असलेले युद्ध आटोपल्यानंतर त्यांच्या प्रदेशातून इंग्रज फौजा काढून घेण्याचे आश्वासन पाळले गेले नाही. उलट इंग्रजांनी आहोमांचा प्रदेश आपल्या साम्राज्यात विलीन करण्याचा प्रयत्न केल्याने असंतोष भडकला. 1828 मध्ये अहोम जमातीने गोमधर कुंवर ह्याला आपला राजा घोषित केले व रंगपुरवर हल्ला करण्याची योजना बनविली. केवळ कंपनीचं चांगले सैन्य असल्यामुळे अहोम जमातीच्या बंडाचा बंदोबस्त झाला. त्यानंतर अहोम जमातीने 1830 मध्ये पुन्हा तयारी केली. यावेळी कंपनीने समझोत्याने मार्ग काढण्याचे ठरविले. महाराजा पुरंदरसिंह नरेंद्रला उत्तर आसाम आणि काही प्रदेश देण्यात आला.

**6)खासी बंड:-**

पूर्वेकडे jantiyaआणि पश्चिमेकडे गारो यामधील पहाडी प्रदेशावर कंपनीने आपला अधिकार प्रस्थापित केला. तेथून ब्रह्मदेशाच्या खोऱ्यातून सिलहटला जोडणारा हमरस्ता बांधण्याची योजना होती. त्याकरिता बरेच इंग्रज आणि बंगाली व इतर मजूर तिथे आणण्यात आले. पण नांवकलोच राजा तिरतसिंह याने ह्या हस्तक्षेपाला विरोध केला. गारू,खांप्ती आणि सिंहपो लोकांच्या मदतीने परकीयांना हुसकावून लावण्याचा प्रयत्न केला. या प्रयत्नाला लवकरच इंग्रजविरोधी जनआंदोलनाचे स्वरूप आले. 1833 मध्ये हा विरोध इंग्रजांनी सैन्यशक्तीच्या वापराने मोडून काढला.

**7)पागलपंथी व फरेजी यांचे बंड:-**

उत्तर बंगालमध्ये पागल पंथी म्हणून ओळखला जाणारा एक अर्थ-धार्मिक संप्रदाय करणशाह यांनी सुरू केला. करमशहा चा मुलगा व वारस टिपू धार्मिक व राजकीय उद्देश समोर ठेवून होता. जमीन कसणाऱ्यांवर जमीनदाराकडून होत असलेल्या अत्याचारांविरुद्ध त्याने बंड पुकारले. 1825 मध्ये टीपुणे शेरपुरवर अधिकार मिळवला व तेथील राजा बनला. बंडखोरांनी आपले हातपाय गारो टेकड्या पर्यंत पसरले होते आणि तेथील अशांततेची परिस्थिती 1840 पर्यंत कायम राहिली.

फरेजि लोक बंगालमधील फरीदपुरचा रहिवासी हाजी शरियतउल्लाने स्थापन केलेल्या एका पंथाचे अनुयायी होते. हे लोक धार्मिक, सामाजिक, राजकीय क्षेत्रात आमूलाग्र परिवर्तन व्हावे या मताचे होते. शरियतउल्लाचा मुलगा दादूमिया याने बंगालमधील इंग्रजांची हकालपट्टी करण्याची योजना बनविली. विषेशतः जमीनदाराकडून जमीन कसणाऱ्यावर होत असलेल्या अत्याचारांना अत्याचाराचा फरेजि विरोध करीत. त्यांचा विरोध 1838 ते 1857 पर्यंत होता आणि नंतर हे लोक वहाबी आंदोलनात सहभागी झाले.

**पश्चिम भारत**

**1)भिल्लांचे बंड:-**

मूळ रहिवासी असलेले भिल खान्देशात व पश्चिम घाटात होते. 1857 ते 1819 या कालखंडात भिल्लांनी आपले नवे स्वामी इंग्रजांविरुद्ध बंड केले. कंपनीच्या अधिकाऱ्यांचा असा दावा होता की या उठावाला पेशवा बाजीराव दुसरा व त्याचा सहाय्यक त्रिंबकजी डेंगळे यांची चिथावणी होती. खरे तर नव्या शासनाप्रती संशयाची भावना आणि शेती करताना सोसावे लागणारे कष्ट या उठावाचे प्रमुख कारण होते. भिल्लांचा हा उठाव दडपून टाकण्यासाठी बरेच इंग्रज सैनिक उपयोगात आणावे लागले. परंतु त्यामुळे भिल्लांना अजिबात भीती वाटली नाही. उलट ब्रह्मदेशात इंग्रजांना अपयश आल्याचे समजताच भिल्लांना अधिकच उत्साह आला. 1825 मध्ये त्यांनी सेवारामच्या नेतृत्वात पुन्हा बंड केले. त्यानंतर 1831 व 1846 मध्ये भिल्लांचा उठाव झाला.

**2)कोळ्यांचे बंड:-**

भिल्लांच्या शेजारी असलेल्या कोळ्यांमध्ये असंतोष होता कारण त्यांचे किल्ले इंग्रजांनी उद्ध्वस्त केले होते. दुसरी गोष्ट म्हणजे इंग्रजी शासनामुळे कोळी जमातीची बेकारी वाढली. परिणामी 1829, 1839 आणि 1844 असे कोळ्यांचे बंड झाले पण ब्रिटिशांनी त्यांचे दमन केले.

**3) कच्छमधील उठाव:-**

कच्छ व काठेवाडमध्ये इंग्रजविरोधी असंतोषाचे वातावरण होते. कच्छचा राजा भारमल आणि जरेजा प्रमुख यांच्यामधील संघर्ष घटनेचे मूळ कारण होते. 1819 मध्ये इंग्रजांनी राजा भारमलला पराभूत करून त्याचा अल्पवयीन मुलाला गादीवर बसविले. मात्र वास्तविक शासन प्रतिनिधी मंडळाकडे होते. ज्याचा सुत्रधार इंग्रज रेसिडेंट होता. ह्या मंडळाने केलेल्या काही बदलामुळे व लावलेल्या अधिक करामुळे असंतोष निर्माण झाला. ब्रह्मदेश युद्धात इंग्रजांच्या पराभवाची वार्ता येताच बंडखोरामध्ये उत्साहा निर्माण झाला आणि त्यांनी भारमलकडे सत्ता सोपविण्याची मागणी केली. त्याविरुद्ध इंग्रजांना बराच काळ लष्करी कारवाई करावी लागली. 1831 मध्ये पुन्हा असंतोष उफाळून आला. अखेर कंपनीला समजुतीचे धोरण स्वीकारावे लागले.

**4) वाघेऱ्यांचे बंड:-**

ओखा विभागात राहणारे वाघेरे प्रारंभापासूनच परकीय सत्तेचे विरोधक होते. जेंव्हा बडोद्याच्या गायकवाडानी इंग्रज सैन्याच्या मदतीने या लोकांपासून जास्त कर वसूल करण्याचा प्रयत्न केला तेव्हा वाघेरा सरदाराने सशस्त्र बंड पुकारले आणि 1818 ते 1819 मध्ये इंग्रज प्रदेशावर आक्रमण केले. शेवटी 1820 मध्ये परस्पर शांतता तह झाला.

**5) सुरतचे मीठ आंदोलन:-**

नको असलेल्या गोष्टींना विरोध करण्याची सुरत शहराची परंपरा जुनी आहे. 1844 मध्ये मिठावरील कर दुप्पट (50 पैशावरून 1 रुपये) करण्यात आला. त्यामुळे जनतेत असंतोष पसरला. सरकारविरोधी भावनेचे रूपांतर लवकरच इंग्रज विरोधी भावनेत होऊन काही युरोपीय लोकांना मारझोड करण्यात आली. असंतोषाची तीव्रता पाहून इंग्रजांनी वाढीव कर मागे घेतला. 1848 मध्ये सरकारने बंगालची स्टॅंडर्ड वजने व मापे लागू करण्याचा प्रयत्न केला पण जनतेने त्यावर निर्धाराने टाकलेला बहिष्कार व शांततामय विरोध यामुळे सरकारला तो विचार सोडून द्यावा लागला.

**6) रामोशांचे बंड :-**

रामोशी म्हणजे पश्चिम घाटात राहणारी एक प्राचीन जमात होय. इंग्रज सत्ता आणि त्यांची प्रशासन पद्धती त्यामुळे रामोशी अस्वस्थ होते. 1822 मध्ये त्यांचा सरदार चितरशिंहणने बंड पुकारून साताऱ्याच्या आजूबाजूचा प्रदेश लुटणे सुरू केले. 1825 - 26 आणि 1829 पर्यंत या प्रदेशातील वातावरण अस्वस्थतेचे होते.

सप्टेंबर 1839 मध्ये साताऱ्याचा राजा प्रतापसिंह यांना काढून टाकण्यात आले आणि प्रदेश सोडून जाण्यास सांगण्यात आले. त्यामुळे संपूर्ण प्रदेशात असंतोष पसरला. मोठ्या प्रमाणावर दंगे सुरू झाले. नरसिंह दत्तात्रेय पेटकर याने काही सैनिक जमवून बदामीचा

किल्ला जिंकून घेतला व त्यावर साताऱ्याच्या राज्याचा ध्वज फडकविला. यानंतर इंग्रजांनी त्या प्रदेशात जास्त लष्कर तैनात केले व शांतता प्रस्थापित केली.

**7) कोल्हापूर व सावंतवाडी मधील बंड:-**

1844 नंतर कोल्हापूर राज्यात प्रशासन व्यवस्थेचे पुनर्षघटन करण्यात आल्याने जनतेत असंतोष उत्पन्न झाला. मराठ्यांच्या किल्ल्याचे वंशपरंपरेने संरक्षण करणाऱ्या लढाऊ अशा गडकरींना काढून टाकण्यात आले. आपली बेकारी समोर दिसत असलेल्या गडकरी यांनी बंड पुकारले. त्यांनी समनगड व भुदरगड हे किल्ले जिंकून घेतले.

ह्याच प्रकारे सावंतवाडीमध्ये बंड झाले या बंडाना दडपून टाकण्यासाठी इंग्रजांना मोठी लष्करी शक्ती वापरावी लागली.

**दक्षिण भारत**

**1) विजयनगरच्या राजाचा विरोध:-**

1765 मध्ये ईस्ट इंडिया कंपनीला उत्तर सरकार प्रदेश मिळाल्यानंतर कंपनीने तेथे कठोर तेचा व्यवहार केला. 1794 मध्ये कंपनीने विजयनगरच्या राजाला त्याचे सैन्य काढून टाकण्यास सांगितले. शिवाय त्याला 3 लाख रुपये देण्यास भाग पाडले. राजाने या गोष्टीस विरोध दर्शविला असता त्याची जहागीर जप्त करण्यात आली. मात्र राजाला त्याच्या प्रजेचे व सैन्याचे पूर्ण समर्थन होते. अखेर संघर्ष करता करता राजा मरण पावला. त्यानंतर कंपनीचा व्यवहार काही प्रमाणात बदलला. राजाच्या मोठ्या मुलाला जहागीर परत करण्यात आली आणि मागितलेल्या धनाची रक्कम कमी करण्यात आली.

डीडीगल व मलबार येथील पाळेगारांनी प्रामुख्याने इंग्रजांच्या भूमिकर व्यवस्थेला विरोध दर्शविला. 1801 ते 5 पर्यंत इंग्रजांना मिळालेल्या जिल्ह्यामध्ये व अर्काट जिल्ह्यातील पाळेगारांचा विरोध सुरू होता. 1856 पर्यंत मद्रास इलाख्यात अधून मधून पाळेगारांचें बंड होत होते.

**2) दिवाण वेला थंपीचे बंड:-**

1805 मध्ये वेलस्लीने त्रावणकोरच्या राजाला तैनाती फौज स्वीकारण्यास भाग पाडले. त्या तहातील अटी बाबत राजाची नाराजी असल्याने पैसे देण्यास त्याने टाळाटाळ केली. त्यामुळे थकित रक्कम वाढत गेली. इंग्रज रेसिडेंटचा व्यवहार अतिशय उद्दामपणाचा होता. परिणामी दिवान वेला थंपीने बंड पुकारले. त्याला नायर सैनिकांची साथ मिळाली. मोठ्या फौजेनिशी इंग्रजांनी या बंडाचा बंदोबस्त केला.

## 1858 चा राणीचा जाहीरनामा

इ. स. 1857चा उठाव ही भारतातील क्रांतिकारी घटना होती. ईस्ट इंडिया कंपनीच्या राजवटीविरुद्ध व इंग्रजांना या देशातून घालवून देण्यासाठी केलेला तो एक अयशस्वी प्रयत्न ठरला. परंतु 1857 च्या या उठावाचे अनेक दूरगामी परिणाम भारताच्या इतिहासावर घडून आले. उठावानंतरची सर्वात महत्त्वाची घटना म्हणजे भारतातील ईस्ट इंडिया कंपनीचे शासन समाप्त होऊन त्या जागी ब्रिटीश पार्लमेंट व सम्राटांचे शासन सुरू झाले.

1858 चा राणीचा जाहीरनामा म्हणजे आधुनिक भारताच्या इतिहासातील एक महत्त्वाची घटना व दस्तऐवज होय. कारण त्यानंतर ब्रिटिश सरकारने भारतावर नव्वद वर्षे राज्य केले. त्याचा आधार हा जाहीरनामा होता. या जाहीरनाम्याने ईस्ट इंडिया कंपनीची भारतावरील सत्ता संपून इंग्लंडच्या राणीच्या नावे कारभार सुरू झाला. हा तर मोठा बदल होताच त्याचबरोबर,या जाहीरनाम्यामुळे राजकीय, आर्थिक, सामाजिक अशा अनेक क्षेत्रांवर परिणाम झाले. म्हणून हा जाहीरनामा महत्त्वाचा आहे. ब्रिटनची राणी व्हिक्टोरियाने 1858 ला हा जाहीरनामा घोषित केला.

**राणी व्हिक्टोरिया (1819 ते 1901)**

1858 सालीच राणीने जाहीरनामा घोषित केला. व्हिक्टोरिया राणी विषयी किंवा तिचे पूर्व चरित्र जाणून घेणे महत्त्वाचे आहे. राणी व्हिक्टोरियाचे नाव अलेक्झांडरिना व्हिक्टोरिया असे होते. तिचा जन्म 24 मे 1819 रोजी लंडन येथे झाला आणि मृत्यू 22 जानेवारी 1901 रोजी झाला. तिला एकूण 81 वर्षांचे आयुष्य लाभले. इंग्लंडचा राजा तिसरा जॉर्जची ती नात होती. गोट्याचा राजपुत्र अल्बर्ट याच्याशी तिचा विवाह झाला. त्यांना एकूण नऊ अपत्ये होती. त्यांचे विवाह युरोपातील राजघराण्यात झाले होते.

1837 साली ग्रेट ब्रिटन आणि आयर्लंड ची राणी म्हणून सत्तेवर आली. 63 वर्ष 7 महिने ती सत्तेवर होती. सर्वाधिक प्रदीर्घ काळ राज्य करणारी ती राज्यकर्ती असून त्या कालखंडाला व्हिक्टोरिया पर्व समजले जाते. ब्रिटिश भारताची ही पहिलीच सम्राज्ञी होय. तिच्या प्रदीर्घ राजवटीत युनायटेड किंग्डमचा राजकीय, आर्थिक, औद्योगिक, लष्कर अशा सर्वच क्षेत्रात प्रगतीचा काळ मानला जातो. 1857च्या उठावानंतर राणी व्हिक्टोरियाने 1858 साली जाहीरनामा काढला. तोच हा प्रसिद्ध राणीचा जाहीरनामा होय. त्यानंतर 1876 साली ब्रिटिश संसदेने तिला 'हिंदुस्थानची सम्राज्ञी' असा किताब दिला. भारतात कधीही न येता ती या देशाची सम्राज्ञी होती. भारताच्या या राणीच्या नावे अनेक ऐतिहासिक स्मारके आहेत. उदा. मुंबईचे सुप्रसिद्ध रेल्वे स्टेशन व्हिक्टोरिया टर्मिनस (V.T),.राणीची बाग, कलकत्याचे व्हिक्टोरिया मेमोरियल इत्यादी. यापैकी V.T.स्टेशन असे नाव 1887 साली दिले गेले. ब्रिटिश साम्राज्य सर्व खंडातील अनेक देशात होते. त्यामुळे पृथ्वीवर राणीची जास्तीत जास्त स्मारके आहेत. रस्ते, बागा, म्युझियम, गावे इत्यादीना त्यांची नावे दिली आहेत.

**1858 चा कायदा किंवा राणीच्या जाहीरनाम्यातील तरतुदी:-**

राणीचा जाहीरनामा हा भारतातील प्रजेला उद्देशून 1858 च्या गव्हर्मेंट ऑफ इंडिया या अधिनियमानुसार घोषित करण्यात आला होता. या जाहीरनाम्यानुसार भारताचा कारभार ईस्ट इंडिया कंपनीकडून इंग्लंडच्या राणीकडे म्हणजेच ब्रिटिश सरकारकडे कायदेशीररित्या सोपविण्यात आला. 1600 पासून कंपनीने कमविलेले भारताचे साम्राज्य इंग्लंडच्या प्रत्यक्ष अमलाखाली येऊन यापुढे 1947 पर्यंत म्हणजेच भारत स्वतंत्र होईपर्यंत त्या शासनाने राज्य केले.

हा जाहीरनामा पंतप्रधान डरबी यांनी तयार केला. त्यावर सही करताना राणीने स्वहस्ताक्षरात लिहिले कि, "जाहीरनाम्यातील उद्देशपूर्तीसाठी परमेश्वराने इंग्रजांना सामर्थ्य द्यावे." यावेळी भारतात गव्हर्नर जनरल म्हणून लॉर्ड कॅनिंग होता. त्याने 1 नोव्हेंबर 1858 रोजी अलाहाबाद येथे खास दरबार भरून राणीचा जाहीरनामा प्रसिद्ध केला. भारतातील सर्व संस्थानिकांना त्याच्या प्रती देण्यात आल्या. भारतातील संविधानिक विकासामध्ये 1858 च्या कायद्याचे महत्त्वाचे स्थान आहे.

**राणीच्या जाहीरनाम्यातील तरतुदी पुढील प्रमाणे:-**

1)भारताची शासन व्यवस्था ईस्ट इंडिया कंपनीच्या हातून काढून घेण्यात येऊन ती ब्रिटिश पार्लमेंट कडे सोपविण्यात आली. या कायद्याच्या दुसऱ्या कलमात म्हटले आहे यापुढे भारताचा कारभार राणी (Crown) मार्फत राणी च्या नावाने चालविला जाईल.

2) ईस्ट इंडिया कंपनीचे संचालक मंडळ बोर्ड ऑफ डायरेक्टर व बोर्ड ऑफ कंट्रोल ही मंडळे बरखास्त करण्यात आली. या दोन्ही संस्थांचे अधिकार भारतमंत्र्याला 'सेक्रेटरी ऑफ स्टेट फॉर इंडिया ला देण्यात आले. भारत मंत्री हे नवीन पद तयार करण्यात आले. भारत मंत्री हा ब्रिटिश पार्लमेंट व मंत्रिमंडळाचा सभासद होता. भारताच्या शासनाचे नियंत्रण, मार्गदर्शन व निरीक्षण करण्याचे अधिकार त्याला देण्यात आले.

3)भारत मंत्र्याला मदत करण्यासाठी इंडिया कौन्सिल नामक पंधरा सभासदांचे एक मंडळ स्थापन करण्यात आले. या 15 पैकी 8 सभासदांच्या नेमणुकीचा अधिकार ब्रिटिश राजपदाकडे होता. तर उरलेल्या 7 सभासदांची निवड प्रारंभी कंपनीचे संचालक मंडळ करेल. भारत मंत्री हा इंडिया कौन्सिलचा अध्यक्ष राहील. भारत मंत्र्याला पदावरून दूर करण्याचा अधिकार ब्रिटिश पार्लमेंटला होता. भारत मंत्री व त्याच्या कौन्सिलच्या सभासदांचे वेतन भारतीय तिजोरीतून दिले जाईल.

4) इंडिया कौन्सिलच्या सदस्यांचे वेतन वार्षिक 1200 पौंड राहील.

5) इंडिया कौन्सिलची सभा आठवड्यातून किमान एक वेळेस व्हावी व गणपूर्तीसाठी 5सदस्य उपस्थित असावेत.

6) भारतमंत्र्याला सल्ला देण्याचा अधिकार इंडिया कौन्सिलला असेल. परंतु हा सल्ला भारतमंत्र्यांवर बंधनकारक नव्हता. भारतमंत्र्याने सल्ला का नाकारला याचे लेखी समर्थन गव्हर्नर जनरल ला द्यावे लागेल.

7) भारत मंत्री व गव्हर्नर जनरल यांच्यात होणारा बहुतेक सर्व पत्रव्यवहार इंडिया कौन्सिल पुढे ठेवावा लागेल.

8) आर्थिक बाबी संबंधीचे सर्व निर्णय भारत मंत्र्याला इंडिया कौन्सिलच्या सल्ल्यानेच घ्यावे असे बंधन होते.

9) दरवर्षी ब्रिटिश पार्लमेंटला भारतमंत्र्यावर भारताचे उत्पन्न, खर्च, भौतिक प्रगती आदी बाबीचा अहवाल पाठविण्याचे बंधन होते.

10)येथून पुढे गव्हर्नर जनरल हा राणीचा व्हॉइसरॉय म्हणून भारताचा कारभार पाहणार होता.

11) व्हॉइसरॉय त्याच्या कौन्सिलचा कायदेविषयक सदस्य, प्रांतीय राज्यपाल, वकील यांच्या नेमणुका ब्रिटिश Crown कडून केल्या जातील. गव्हर्नर जनरलच्या व प्रांतीय राज्यपालांच्या कार्यकारी मंडळाचे सभासद भारतमंत्र्याच्या द्वारा इंडिया कौन्सिलच्या सल्ल्याने नियुक्त केले जातील. व्हॉईसरॉय हा भारतमंत्र्याच्या आज्ञेनुसार कार्य करील.

12) या कायद्याद्वारे संरक्षण हे भारत सरकार व कौन्सिल स्थित भारतमंत्री या दोघात वाटले गेले. 13) यापुढे भारतीय संस्थाने ब्रिटिश साम्राज्यात विलीन केली जाणार नाहीत.

14) भारतीयांना पूर्ण धार्मिक स्वातंत्र्य असेल. त्यात ब्रिटिश सरकार हस्तक्षेप करणार नाही.

15) काळा-गोरा, धर्म, जात असा भेदभाव न करता पात्रतेप्रमाणे सर्वांना शासकीय नोकऱ्या मिळतील.

16) कायद्यापुढे सर्व समान असतील. सर्वांना समानतेची वागणूक दिली जाईल.

17) सरकारचे धोरण लोककल्याणाचे असेल. लोकांच्या कल्याणाची कामे केली जातील.

18) धर्म, संस्कृती इत्यादी बाबतीत भारतीयांच्या भावना जोपासल्या जातील.

**1858 च्या कायद्याचे किंवा राणीच्या जाहीरनाम्याचे दोष:-**

1) भारत मंत्र्याला अनिर्बंध अधिकार होते.

2) इंडिया कौन्सिलला फार कमी अधिकार होते.

3)भारत मंत्री व इंडिया कौन्सिलच्या सदस्यांचा वेतन खर्च जो प्रचंड होता तो भारताच्या तिजोरीवर टाकण्यात आला.

4) कोणत्याही लष्करी मोहिमाचा भार भारताच्या उत्पन्नातून खर्च करण्याची परवानगी मिळाली ब्रिटिशांना मिळाली.

5) 1858 च्या पूर्वी कंपनीच्या कारभाराची चौकशी जशी ब्रिटिश पार्लमेंट करीत असे तशी या कायद्यानंतर होत नसे. भारतमंत्री भारताचा कारभार सुरळीत चालु आहे असे पार्लमेंटला सांगेल व पार्लमेंट त्यावर विश्वास ठेवील.

**राणीच्या जाहीरनाम्याचे परिणाम:-**

ईस्ट इंडिया कंपनीच्या कारभाराबाबत हिंदी जनतेच्या अनेक तक्रारी होत होत्या. त्या दूर करण्यात कंपनीला अपयश आले. आणि त्यातून 1857चा उठाव झाला. पण त्यासाठी लोक कंपनीला नव्हे तर ब्रिटीश सरकारला जबाबदार धरत होते. कंपनीच्या चुकांचा दोष इंग्लंड वर येत होता. त्यामुळे 1857च्या उठावा पूर्वीच त्याकडे लक्ष देऊन ब्रिटिश सरकारने कंपनीवर बंधने आणण्यास सुरुवात केली होती. कंपनीवर नियंत्रण ठेवण्यासाठी 1784, 1818 व 1830 हे कायदे पास केले होते. आणि दर 20 वर्षांनी आढावा घ्यायचे ठरले होते. त्यानुसार 1853 चा चार्टर एक्ट मंजूर झाला. तरी केवळ 4 वर्षात भारतात 1857चा उठाव झाला. हा उठाव म्हणजे ईस्ट इंडिया कंपनीचे पूर्ण अपयश ठरले. इंग्लंड सरकारने कंपनीला पूर्ण सहकार्य केले. त्यामुळेच उठाव दडपून टाकण्यात कंपनीला यश आले. त्याचबरोबर कंपनीच्या हातून भारताचा कारभार काढून घ्यावा आणि ब्रिटिश पार्लमेंटने ताबा घ्यावा ही मागणी तीव्र झाली. त्यासाठी इंग्लंडची राणी व्हिक्टोरियाने तातडीने 1858 चा जाहीरनामा घोषित केला. हा जाहीरनामा म्हणजे यापुढे राज्यकारभार कसा केला जाईल, याची राणीने भारतीय जनतेला दिलेली आश्वासने होती. त्यानुसार भारतीय प्रजेला संस्थानिकांना संतुष्ट करण्याचा प्रयत्न केला होता. त्याचबरोबर कंपनीच्या कारभारावर असमाधानी असणाऱ्या इंग्लंडच्या जनतेलाही संतुष्ट करणारे अनेक निर्णयही घोषित केले होते.

1858 च्या कायद्याने भारताच्या घटनात्मक विकासात एका नव्या युगाची सुरुवात झाली. सरकार चालविण्यासाठी एक नवी प्रशासन यंत्रणा निर्माण केली.1600 मध्ये स्थापन झालेल्या ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीचा कारभार या कायद्याने संपुष्टात आणला व ब्रिटिश राजपदाची राजवट या कायद्याने भारतात सुरू केली. भारत मंत्री नावाचे एक नवीन पद निर्माण केले. सुदैवाने हे पद फार मोठ्या व्यक्तीने उदाहरणार्थ लॉर्ड सोलीसबरी, लोर्ड मोरलो इत्यादींनी भूषविले होते. भारताच्या स्वातंत्र्यप्राप्ती पर्यंत हे पद टिकले. भारतमंत्री व त्याच्या इंडिया कौन्सिलची निर्मिती हे कायद्याचे घटनात्मक दृष्ट्या अत्यंत महत्त्वाचे कार्य होते. परंतु या मंडळाचे वेतन भारतीय तिजोरीतून देण्याची जी व्यवस्था या कायद्यात केली ती भारतावर अन्यायकारक होती. तरीही ही व्यवस्था 1935 पर्यंत चालू राहिली. या कायद्याने भारतीय कारभार इंग्लंडमधून पाहणाऱ्या व्यवस्थेत बदल करण्यात आला. पुढील काळात वेळोवेळी 1861, 1892, 1909, 1919 व 1935 असे कायदे पास करून ब्रिटिश प्रशासनात सुधारणा होत गेली.